निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : ८९ वा
सोमवार -०२ जून २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## संक्षिप्त

### अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत १० लाखांहून अधिक विद्यार्थ्यांची नोंदणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** इयत्ता अकरावीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी येणाऱ्या सर्व अडचणी दूर करण्यात येत असून नोंदणी प्रक्रियेच्या पहिल्या फेरीमधील नोंदणीमध्ये दि. १ जून रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत अखेर १० लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असल्याची माहिती सहसंचालक (माध्यमिक) डॉ.श्रीराम पानझाडे यांनी दिली आहे.

प्रवेश प्रक्रियेतील पहिली फेरी सुरू झाल्यानंतर संपूर्ण राज्यातून विद्यार्थी नोंदणी करत असून संकेतस्थळावर ताण येत असल्याने थोड्या प्रमाणात संकेतस्थळ संथ गतीने चालणे तसेच प्रवेश शुल्क भरण्यामध्ये अडचणी कॉलेज पसंतीक्रम भरण्यामध्ये अडथळे येणे अशा अडचणी निदर्शनास आल्या. याबाबींवर संबंधित कंपनीमार्फत तत्काळ उपायोजना/ पर्यायी व्यवस्था करुन प्रक्रिया सुरळीत राहण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेचा नोंदणी अर्ज भरण्याकरिता दिनांक २६ मे २०२५ ते ३ जून २०२५ पर्यंतचा एकूण नऊ दिवसांचा पुरेसा कालावधी देण्यात आला असून या फेरीची तात्पुरती गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर कोणत्याही विद्यार्थ्याची तक्रार असल्यास अंतिम गुणवत्ता यादी जाहीर होण्यापूर्वी प्रत्येक तक्रार दूर केली जाईल असेही विभागामार्फत स्पष्ट करण्यात आले आहे. ही सर्व प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडली जात असून कोणत्याही विद्यार्थ्याने काळजी करू नये असे आवाहन करण्यात आले आहे.

अकरावी प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावरील काही बदल नवीन पर्याय समाविष्ट करणे आवश्यक असल्याने त्याबाबतचे काम सुरू होते. यादरम्यान क्षेत्रिय स्तरावरुन आणि तज्ज्ञांकडून प्राप्त होणारे बदल यामुळे संकेतस्थळ तांत्रिकदृष्ट्या परिपूर्ण करण्यासाठी काही कालावधी लागला. त्यामुळे प्रक्रियेच्या जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार दि. २१ मे २०२५ पासून प्रत्यक्ष विद्यार्थी नोंदणी सुरू करणे शक्य झाले नाही. यानंतर संकेत स्थळाबाबत तांत्रिक अडचणी दूर करुन दि. २६ मे २०२५ पासून विद्यार्थी नोंदणी सुरू करण्यात आली. या बदलाबाबत संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक पुणे) यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे स्पष्टीकरण देखील दिलेले आहे.

विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींचे निवारण करण्यासाठी विभागस्तरावर तांत्रिक सल्लागार मार्गदर्शन केंद्र हेल्पलाईन नंबर सपोर्ट डेस्क संकेतस्थळावर मराठी आणि इंग्रजी भाषेमधील माहिती पुस्तिका प्रश्न-उत्तरे विद्यार्थी युजर मॅन्युअल 'करीअर पाथ' चा टॅब उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या लॉगिनमध्ये विद्यार्थ्यांस काही बदल करावयाचा असल्यास ग्रीवन्सचा टॅब उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. विद्यार्थी/ पालक यांच्यासाठी विभाग स्तरावर/ जिल्हा स्तरावर अधिकारी/ कर्मचारी यांचे संपर्क क्रमांक संकेत स्थळावर देण्यात आलेले असल्याचेही विभागामार्फत स्पष्ट करण्यात आले आहे.

सन २०२५-२६ पासून संपूर्ण राज्यात प्रवेश प्रकिया राबविण्यात येणार असल्याने यामध्ये ९३४२ कनिष्ठ महाविद्यालयांमधून २० लाख ८८ हजारांहून अधिक विद्यार्थी प्रवेश क्षमता उपलब्ध झाली असल्याचेही शालेय शिक्षण विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

### किमान १० जूनपर्यंत पावसात घट शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** बदलेलेल्या वातावरणामुळे मान्सूनच्या प्रवासाची गती कमी होण्यास सुरुवात झाली, आणि आता तर मान्सूनचा प्रवास पूर्णपणे रखडला आहे. किमान १० जूनपर्यंत तरी मान्सूनचा प्रवास थांबणार असल्याचा अंदाज आहे, ज्यामुळे या दरम्यान केवळ पश्चिम किनारपट्टी आणि राज्यातील काही इतर किरकोळ भागात प्रामुख्याने हलका पाऊस पडण्याचा अंदाज आहे. राज्यातील बहुतांश भागात मात्र कोरडे हवामान अपेक्षित आहे, ज्यामुळे कमाल तापमानात वाढ होईल. विदर्भात ४० अंशापर्यंत कमाल तापमान राहण्याची शक्यता आहे तर मराठवाडा आणि खानदेशात कमाल तापमान ३५ ते ४० अंशामध्ये राहील. या कोरड्या हवामानाचा वाईट परिणाम पेरणी आणि लागवडीवर पडण्याची शक्यता आहे.कोणत्याही खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवून शेतकऱ्यांनी (प्रामुख्याने कोरडवाहू) पेरणी आणि लागवडीची घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागाकडून परत एकदा करण्यात येत आहे.




# समाजातील प्रत्येक गरजूला उत्तम उपचार करा-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**

**नाशिक/प्रतिनिधी/** रुग्ण सेवा ही ईश्वर सेवा असल्याने मुख्यमंत्री सहाय्यता निधी तथा धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातील सर्वांनी गतिशीलता, पारदर्शकता आणि संवेदशनशीलतेने काम करुन समाजातील प्रत्येक गरजूला उत्तम उपचार मिळण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण तथा संशोधन अकादमी (मित्रा) नाशिक येथे आयोजित मुख्यमंत्री सहाय्यता निधी तथा धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातील जिल्हास्तरीय अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षण कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमास जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, आमदार सीमा हिरे, आमदार ड. राहुल ढिकले, पोलीस उपमहानिरीक्षक दत्तात्रय कराळे, जिल्हाधिकारी जलज शर्मा, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाची रचना विश्वस्त भावनेने केली आहे. परदेशातील औद्योगिक, सामाजिक दायित्व निधी प्रमाणपत्र मिळविणारा देशातील पहिला कक्ष आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा वापर वैद्यकीय क्षेत्रात करण्याची संकल्पना २०१४ पासून राबविण्यास सुरूवात केली. त्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाची संस्थात्मक रचना उभी केली असून सामान्य माणसाला मदत होईल, अशी या कक्षाची रचना आहे. आता या कक्षाची जिल्हास्तरावरही स्थापना करण्यात आली आहे. या कक्षाच्या माध्यमातून धर्मादाय रुग्णालयाच्या कामकाजाच्या बाबतीतही पारदर्शक आणून दुरूपयोग टाळावा लागणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख श्री. नाईक यांनी प्रास्ताविक केले. 'रुग्ण मित्र' योजना मतदारसंघनिहाय सुरू करण्यात येत आहे. सामाजिक




संस्थांची फंडासाठी मदत घेणार असून केंद्र आणि राज्य शासनाच्या आरोग्य योजनांची माहिती एका प्लॅटफॉर्म आणण्यासाठी पोर्टल सुरू करण्यात येणार आहे. याठिकाणी उपस्थित सर्व अधिकारी, कर्मचारी हे आरोग्यदूत म्हणून काम करतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.यावेळी राज्यस्तरीय कक्षाचे प्रशासकीय अधिकारी मुख्यमंत्री सचिवालय तथा प्रकल्प संचालक महाराष्ट्र एड्स नियंत्रण संस्था डॉ. सुनील भोकरे, सहकक्ष प्रमुख शरद घावटे, उपकक्ष प्रमुख शेखर नामदास, जनसंपर्क अधिकारी डॉ. जगदीश सकवान, वैद्यकीय समन्वयक डॉ. सवानंद सोनार, प्रशासकीय सल्लागार दत्तात्रय विभुते यांच्यासह राज्यातील सर्व जिल्हास्तरीय कक्षाचे प्रमुख अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### इगतपुरीत येथील ९ दिवसांची ध्यानसाधना संपून धनंजय मुंडे गेले कुणीकडे?

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/**



संतोष देशमुख प्रकरणानंतर धनंजय मुंडेंना मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. मुंडेंवर गंभीर आरोप करण्यात आले. वादाच्या केंद्रस्थानी सापडलेल्या मुंडेंनी इगतपुरीच्या विपश्यना केंद्रात जाऊन ध्यानसाधना केली आहे. ध्यानसाधना पूर्ण करून मुंडे तिथून रवाना झालेत. मात्र, त्यानंतर मुंडे गेले कुणीकडे असा प्रश्न सर्वांना पडतो आहे.

गेल्या काही दिवसांपासून राज्यात चर्चेच्या केंद्रस्थानी राहिलेले माजी मंत्री धनंजय मुंडे अचानक ध्यानसाधनेसाठी गेले. इगतपुरीमधील विपश्यना केंद्रात ९ दिवस धनंजय मुंडेंनी ध्यानसाधना केली. ना कुठला मोबाईल फोन ना बाहेरच्या जगाशी कुठला संपर्क. मन:शांतीसाठी तब्बल ९ दिवस मुंडे ध्यानस्थ झाले होते. ध्यानसाधनेच्या शेवटच्या दिवशी ग्रूप फोटो किंवा कुठल्याही साधकासोबत बोलणंही मुंडेंनी टाळलं. रविवारी पहाटेच त्यांची साधना संपली आणि धनंजय मुंडे रवाना झाले. मात्र ते कुठे गेले याची कुणालाच कल्पना नाहीये.

महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर संतोष देशमुख प्रकरणात धनंजय मुंडे यांना आपलं मंत्रिपद गमवावं लागलं. त्यांच्यावर गंभीर आरोपही होऊ लागल्याने त्यांची राजकीय कारकीर्द धोक्यात येऊ लागली होती. त्यामुळे वादात अडकलेले धनंजय मुंडे मन:शांतीकडे वळाले आहेत. मुंडे अचानक ध्यान करण्यासाठी निघून गेल्यानं राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाल्यात.

## बेंगळुरु येथील इनोव्हेशन केंद्र आणि कृषी विज्ञान विद्यापीठाला कृषिमंत्री ॲड माणिकराव कोकाटे यांची भेट

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** स्मार्ट शेतीसाठी बेंगळूरच्या धर्तीवर महाराष्ट्रात प्रगत कृषी केंद्रांची (इनोव्हेशन केंद्र) उभारणी करण्याचा धोरणात्मक आराखडा तयार करण्यात येईल. यामुळे शेतीत शिक्षण घेणाऱ्या नव्या पिढीला अत्याधुनिक तंत्रज्ञान मिळेल व शेतकऱ्यांना नव्या साधनांचा लाभ होईल, ज्यामुळे शेती अधिक उत्पादनक्षम, कार्यक्षम व शाश्वत होईल.असे मत कृषिमंत्री ॲड माणिकराव कोकाटे यांनी व्यक्त केले.

बेंगळुरू येथील स्मार्ट शेतीसाठी नवप्रवर्तन केंद्र, कृषी विज्ञान विद्यापीठ (UAS) ला कृषीमंत्री ॲड माणिकराव कोकाटे यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने भेट दिली. कृषी विज्ञान विद्यापीठचे कुलगुरू, स्मार्ट शेतीसाठी इनोव्हेशन केंद्रातील प्राध्यापक व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

कृषीमंत्री ॲड माणिकराव कोकाटे यांनी व महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने स्मार्ट शेतीसाठी (CDSA) इनोवेशन केंद्रात वापरल्या जाणाऱ्या प्रगत कृषी तंत्रज्ञान व नवकल्पनांचा प्रत्यक्ष अनुभव या भेटीदरम्यान घेतला. महाराष्ट्रात अशा प्रकारची अत्याधुनिक केंद्रे स्थापन करण्यासाठी शक्यता आणि कार्यपद्धती यांचा अभ्यास करून विद्यार्थ्यांना व शेतकऱ्यांना लाभ देणे हा या भेटीचा मुख्य उद्देश होता. यावेळी शिष्टमंडळाने संपूर्ण नाविन्यपूर्ण प्रकल्पांची पाहणी केली.

कृषीमंत्री ॲड माणिकराव कोकाटे यांनी केले बेंगळूर येथील नाविन्यपूर्ण उपक्रमांचे कौतुक

कृषीमंत्री ॲड माणिकराव कोकाटे यांनी केंद्राच्या पाहणीनंतर कृषी विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरूंशी सविस्तर चर्चा केली. या बैठकीत नवप्रवर्तन केंद्राच्या कार्यपद्धती व पायाभूत सुविधा, विद्यार्थ्यांना या तंत्रज्ञानामुळे मिळणारे व्यावहारिक ज्ञान व कौशल्य, शेतकऱ्यांच्या अनुभवांद्वारे मिळालेला फायदा - उत्पादनवाढ, खर्चात बचत, आणि शाश्वत शेतीकडे वाटचाल याविषयी सविस्तर चर्चा झाली.केंद्रात सादर करण्यात आलेल्या तंत्रज्ञान व नवकल्पनांनी कृषिमंत्री ॲड माणिकराव कोकाटे प्रभावित झाले. त्यांनी अशा केंद्रांचा शेतीतील क्रांतीसाठी असलेला उपयोग आणि विद्यार्थ्यांना व शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी उपक्रमांची माहिती घेऊन राज्यात त्याबाबत नक्कीच कार्यवाही करू असेही सांगितले.



स्वयंचलित ट्रॅक्टर्स आणि कृषी अवजारे: स्वयंचलित ट्रॅक्टर व त्यांच्यासोबत चालणाऱ्या अवजारांची कार्यक्षमता व श्रमबचतीसाठी असलेले महत्त्व.कृषी ड्रोन: ड्रोनचा वापर पिकांचे निरीक्षण, कीड ओळख, आणि अचूक फवारणीसाठी कसा करता येतो याचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले, शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने या उपक्रमाची माहिती घेतली.प्रेसिजन शेती तंत्रज्ञान: जी. पी. एस. आधारित प्रणाली व बदलत्या दराने खते व औषधे देण्याच्या प्रणालीसह अचूक शेती तंत्रज्ञानाचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले.शेती उपकरण डिझाईन लॅब्स: स्थानिक गरजांसाठी उपयुक्त व नवोन्मेषक्षम शेती उपकरणे तयार करणाऱ्या लॅब्सची यावेळी माहिती देण्यात आली.

## ब्राझीलमध्ये प्रश्नाचं उत्तर देत शशी थरुर म्हणाले, 'आता वेळ आलीय की...'

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली / प्रतिनिधी/** भारतानं पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानला उत्तर दिलं होतं. यानंतर पाकिस्तानचा दहशतवादासंदर्भातील खरा चेहरा जगासमोर आणण्यासाठी जगभरातील विविध देशात खासदारांचं शिष्टमंडळ पाठवलं होतं. काँग्रेस खासदार शशी थरुर हे ७ पैकी एका शिष्टमंडळाचं नेतृत्त्व करत होते. शशी थरुर ब्राझीलमध्ये पोहोचल्यानंतर त्यांना माध्यमांकडून काँग्रेस नेत्यांकडून होत असलेल्या

### काँग्रेस नेत्यांकडून टीका

त्यांच्या टीकेसंदर्भात विचारलं असता ते म्हणाले की आता वेळ आलीय की आम्ही आमच्या मिशनवर लक्ष केंद्रीत करावं. काँग्रेस नेत्यांसदर्भात मीडियानं प्रश्न विचारले असता शशी थरुर यांनी एका समृद्ध लोकशाहीत टीका आणि आलोचना होणं शक्यआहे. मला वाटतं की सध्या आम्ही त्या गोष्टींवर लक्ष देऊ शकत नाही. भारतात जेव्हा परत येईन तेव्हा आपल्याला नक्कीच सहकारी, टीकाकार आणि माध्यमकर्मींसोबत चर्चा करण्याची संधी मिळेल. सध्या आम्ही आम्हाला ज्या देशात जायचं आहे त्याच्यावर लक्ष केंद्रीत करत आहे. जिथं आम्ही जातोय तिथं तिथल्या लोकांसमोर संदेश पोहोचवत आहोत. शशी थरुर विदेशात भारताची बाजू सक्षमपणे मांडत आहेत, पाकिस्तानचा दहशतवादासंदर्भातील खरा चेहरा जगासमोर मांडत आहेत. शशी थरुर ज्या प्रभावीपणे भारताची बाजू मांडत आहेत त्यानुसार एकेकाळचे त्यांचे टीकाकार आता चाहते बनले आहेत.

शस्त्रसंधीसंदर्भात काँग्रेसकडून सवाल



पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर काँग्रेसनं मोदी सरकारला समर्थन दिलं होतं. काँग्रेसनं पहलगाम दहशतवादी हल्ला, ऑपरेशन सिंदूरनंतर संसदेच्या विशेष अधिवेशनाचं आयोजन करण्याची मागणी केली होती. सरकारनं ती मागणी मान्य केली नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वपक्षीय बैठकीला उपस्थित राहावं, अशी मागणी देखील काँग्रेसची होती. सरकारनं ती देखील मागणी मान्य केलं नाही. काँग्रेसकडून शस्त्रसंधीमध्ये अमेरिकेच्या भूमिकेवर प्रश्न विचारले आहेत. काँग्रेसनं सुचवलेली चार खासदारांची नावं देखील स्वीकारली गेली नव्हती. केंद्रानं शशी थरुर यांच्याकडे एका शिष्टमंडळाचं नेतृत्त्व सोपवण्यात आलं.

## लोकशाहीर अण्णा भाऊ साठे स्मारकासाठी २५ कोटींची तरतूद -सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे सांगली जिल्ह्यात वाटेगाव (ता. वाळवा) येथे त्यांच्या जन्मभूमीत राष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यात येणार आहे. या स्मारकासाठी शासनाने २५ कोटी रुपये निधीची तरतूद केली आहे. या स्मारकाच्या नियोजित स्थळाची पाहणी करून स्मारकाची जागा पंधरा दिवसात ताब्यात घेण्याची प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले असल्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले.सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट म्हणाले, सद्यः स्थितीत पाणीपुरवठा विभागाच्या मालकीतील १ हेक्टर ३५ आर क्षेत्रफळाची जागा स्मारकासाठी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून अधिकाऱ्यासमवेत आवश्यक नियोजनावर चर्चा करण्यात आली आहे. स्मारक उभारणीमुळे अण्णा भाऊ साठे यांचे कार्य पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचणार असल्याचे मंत्री शिरसाट यांनी यावेळी सांगितले.

यावेळी खासदार धैर्यशील माने, आमदार सत्यजित देशमुख, आमदार सदाभाऊ खोत, आमदार डॉ. अशोकराव माने, जिल्हाधिकारी अशोक काकडे, बार्टीचे महासंचालक सुनिल वारे तसेच लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या कुटुंबातील सदस्य सचिन साठे उपस्थित होते.सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जन्मभूमीला भेट देऊन शिल्पसृष्टीची ही पाहणी केली तसेच त्यांच्या कुटुंबियांची भेट घेतली.



## मंत्र्यांच्या पीएस, ओएसडीवर मुख्यमंत्री कार्यालयाचा वॉच

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/**मंत्र्यांच्या पीएस, ओएसडीवर मुख्यमंत्री कार्यालयाचा वॉच, पीएस, ओएसडींच्या कामाचं होणार मूल्यमापन महायुती सरकारच्या मंत्र्यांचे खासगी सचिव आणि विशेष कर्तव्य अधिकारी म्हणजेच पीएस आणि ओएसडी यांची निवड पूर्ण झाली आहे. मात्र त्यांच्यावर आता मुख्यमंत्र्यांचा वॉच असणार आहे. केवळ नियुक्तीच नव्हे, तर आता त्यांच्या कामकाजावर बारकाईने नजर ठेवली जाणार असल्याची माहिती मिळत आहे.महायुती सरकारमधील तिन्ही पक्षांच्या मंत्र्यांचे पीएस, ओएसडी नेमण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयाने केले आहे. एवढ्यावरच न थांबता आता या पीएस, ओएसडी यांच्या कामगिरीवर वॉच ठेवला जात असल्याची माहिती मिळत आहे. कोणी काही चूक केली तर त्याला बोलावून समजही दिली जाणार म्हटलं जात आहे.

आतापर्यंत ३५ पीएस आणि ९० ओएसडी नेमण्यात आले आहेत. तर सात मंत्र्यांकडील ओएसडी नेमण्याची प्रक्रिया सुरू आहे. नियुक्ती झालेल्यांना 'चांगले काम करा, काही गडबड करणार असाल तर तुमच्यावर वॉंच आहेच,' याची जाणीव करून दिल्याची माहिती आहे.

मंत्र्यांच्या OSDdr मुख्यमंत्र्यांचा वॉच

- पीएस, ओएसडी नेमताना त्यांची विश्वासार्हता तपासली जात आहे.

**पुढील वृत्त पान २ वर...**

# महाराष्ट्रात पुन्हा भोंग्यांचं राजकारण

**मशिदींवरील भोंग्यांवरून पुन्हा एकदा वाद पेटण्याची शक्यता आहे.मशिदींवरच्या भोंग्यांमुळे जाणीवपूर्वक मुस्लीमांना टार्गेट केलं जात असल्याचा आरोप अबू आझमींनी केलाय.त्याला मनसेनं प्रत्युत्तर दिलं.**

**मशिदींवरच्या भोंग्यांविरोधात राज ठाकरेंनी जाहीर भूमिका घेतली होती.भोंगे उतरवले नाहीत तर मशिदींसमोर जाऊन हनुमान चालिसा पठण करा, असं आवाहनही राज ठाकरेंनी मनसैनिकांना केलं होतं.आता मशिदीवरील भोंग्यांचा मुद्दा पुन्हा एकदा तापण्याची शक्यता आहे.सपाचे आमदार अबू आझमी यांनी केलेलं एक वक्तव्य याला कारणीभूत ठरलंय.**

**उत्तर प्रदेशच्या मंदिरातही जोरजोरात कीर्तन वाजत असतात, त्यावर कधीच कुणी आक्षेप घेत नाही, असं आझमींनी म्हटलंय.भोंग्यांच्या मुद्यावरुन केवळ मुस्लिमांना त्रास दिला जातो, असा आरोप आझमी यांनी केलाय.व्होट बँकेसाठी भोंग्यांचं राजकारण सुरू असून पोलिसांनी डेसिबल तपासावं असं आवाहनही आझमींनी केलंय.**

**मशिदीवरील भोंग्यांबाबत राज ठाकरेंनी जाहीर भूमिका घेतली होती.त्यानंतर अनेक ठिकाणी भोंगे उतरवले गेले.आता अबू आझमींनी मशिदींवरच्या भोंग्यांमुळे फक्त मुस्लीमांना टार्गेट केलं जात असल्याचा आरोप केलाय.याला आता मनसेनं प्रत्युत्तर दिलंय.जे चुकीचं आहे त्यालाच राज ठाकरे आणि मनसेनं विरोध केलाय. आम्ही राजकारण करत नाही, असा पलटवार मनसेनं केलाय.**

**राज ठाकरेंनी जाहीर सभेतून मशिदीवरील भोंगे हटवले गेले पाहिजेत अशी आक्रमक भूमिका घेतली होती.माझ्या हातात सत्ता द्या, ४८ तासात मशिदीवरचे भोंगे हटवून दाखवतो, असं विधानही विधानसभा निवडणुकीच्या वरळीच्या प्रचारसभेत राज ठाकरेंनी केलं होतं.**

**आता अबू आझमींनी भोंग्यांच्या मुद्याला हात घालून मनसेला डिवचलंय. येत्या काळात याच मुद्यावरून अबू आझमी विरुद्ध मनसे असा संघर्ष पेटण्याची शक्यता नाकारता येत नाही.**

# हवाईदल प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी देशहिताच्या दृष्टीने सत्य बाजू मांडली

देशाच्या भोवताल भारत विरोधी जाळे विणले आहे यात मुख्य भूमिका चीनची असुन चीनच्या मदतीने पाकिस्तान, बांग्लादेश हे देश नेहमीच काहीतरी कुरापती निर्माण करीत असतातच. कारण यांना भारताचा विकास पहावत नाही. त्यामुळेच सिमावर्ती भागात आपल्याला आतंकवादी कारवाया मोठ्या प्रमाणात दिसून येतात. आज संपूर्ण जग अत्याधुनिक युगाकडे वाटचाल करीत आहे.त्या अनुषंगाने भारताचीही संपूर्ण तयारी सुध्दा आहे आणि त्या दिशेने जात आहे यात दुमत नाही.परंतु जेव्हा देशाच्या सुरक्षेचा प्रश्न येतो तेव्हा आपल्या जवळ संपूर्ण अत्याधुनिक सामुग्री असने गरजेचे असते.

परंतु आपण जेव्हा कोणत्यांही देशा सोबत किंवा देशातील कंपनी सोबत कोणत्याही शस्त्रांचा करार यासाठी केला जातो की आपल्याला माहीत असते की या वस्तू किंवा सामग्री ठराविक वेळेपर्यंत आपल्याजवळ उपलब्ध होईल.परंतु असे होत नसल्याचे स्पष्ट दिसून येते.त्यामुळे हवाईदल प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंह यांनी उपस्थित केलेला प्रश्न अत्यंत वाजवी आणि देश हिताचा आहे असे मला वाटते. कारण देशाच्या १४० कोटी जनतेच्या सुरक्षा कवचचा प्रश्न, देशाच्या सिमावर्ती भागाचा प्रश्न आणि सैन्य शक्तीचा प्रश्न महत्त्वाचा आहे त्यामुळे कोणत्याही सुरक्षा व्यवहारामध्ये कोणत्याही प्रकारच्या करारामध्ये हयगय किंवा दिरंगाई झाली तर त्याचे प्रायश्चित्त देशाला व देशातील नागरिकांना गंभीर स्वरूपात भोगावे लागु शकतात. त्यामुळे देशाच्या सुरक्षिततेच्या बाबतीतील कोणताही करार असो तो तंतोतंत व सटीक असायला हवा यात कोणत्याही प्रकारची हयगय किंवा विलंब नकोच.भारताच्या संरक्षण खरेदी प्रकल्पांना सातत्याने होणाऱ्या विलंबाबद्दल हवाईदल प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी दिनांक २९ मे २०२५ ला भारतीय उद्योग महासंघाची (सीआयआय) वार्षिक शिखर परिषद दिल्लीत झाली.यावेळी हवाईदल प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग बोलत होते.यावेळी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, नौदल प्रमुख डमिरल दिनेश त्रिपाठी, सीआयआयचे अध्यक्ष संजीव पुरी, डीआरडीओ चे अध्यक्ष डॉ.समीर कामत आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.करारांमधील अवास्तव कालमर्यादांवर आणि कामगिरीतील कमतरतांवर स्पष्टपणे बोलण्याचे धारिष्ट्य न दाखवणाऱ्या संरक्षण अधिकाऱ्यांवरही यावेळी एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी टीका केली व सर्वांच्या उपस्थितीत एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी तीव्र चिंता व्यक्त केली.ते म्हणतात की अनेकदा आम्हाला करार करतांना माहीत असते की संबंधित प्रणाली कधीच येणार नाही. असा एकही प्रकल्प मला आठवत नाही जो वेळेवर पुर्ण झाला आहे.

आपण असे आश्वासन का देतो,जे साध्य करता येत नाही?या शब्दात हवाई दलप्रमुखांनी आपली नाराजी व्यक्त केली. माझ्यामते हवाईदल प्रमुखांची नाराजगी देशहिताच्या दृष्टीने वाजवी असल्याचे मी समजतो.विशेषत: स्वदेशी प्रकल्पांशी संबंधित असलेल्या अनेक संरक्षण प्रणालीच्या विलंबाकडे हवाई दलप्रमुखांनी यावेळी लक्ष वेधले हलक्या लढाऊ विमानांच्या (एलसीए) प्रकल्पाचा संदर्भ देत ते म्हणाले,तेजस एमके १ए या लढाऊ विमानांसाठी फेब्रुवारी २०२१ मध्ये हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड सोबत (एचएएल) ४८ हजार कोटी रुपयांचा करार करण्यात आला.करारानुसार या विमानांचे वितरण मार्च २०२४ पासून अपेक्षित होते.मात्र मागणी केलेल्या ८३ पैकी एकाही विमानाचे वितरण करण्यात आलेले नाही.ही देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत चिंताजनक बाब आहे.

कारण ज्या विमानांचे उत्पादन आपल्याला भारतातच करायचे आहे आणि आपण कराराचे पालन करीत नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे.यावर प्रधानमंत्री, राष्ट्रपती व रक्षा मंत्रालयाने जातीने लक्ष देण्याची गरज आहे व विलंब का होत आहे याचीही चौकशी व्हायला पाहिजे व सरकारने हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड ला जाब विचारायला पाहिजे की आपण कराराची पुर्तत: का केली नाही?याकरीता हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड ला दंडीत सुध्दा करायला पाहिजे आणि भविष्यात कोणत्याही प्रकारच्या कराराच्या बाबतीत दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही अशा पध्दतीचा नोटीस सरकारने हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेडला बजावला पाहिजे.कारण देशाच्या सुरक्षिततेच्या प्रश्न आहे यात कोणत्याही प्रकारची तडजोड नकोच.देशांतर्गत किंवा विदेशांतर्गत कोणत्याही प्रकारचा करार असो त्याची पुर्तता वेळेवरच झाली पाहिजे तेव्हाच त्याला योग्य करार समजल्या जाईल.ऑपरेशन सिंदूर बद्दल बोलताना हवाई दलप्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग म्हणतात ऑपरेशन सिन्दुर चा राष्ट्रीय विजय म्हणून गौरव केला आणि ही मोहीम अंमलात आणण्यासाठी सर्व सैन्य दलांनी एकत्र येऊन काम केल्याचे सांगितले. ही बाब सत्य आहे की ऑपरेशन सिन्दुर हा राष्ट्रीय विजय आहे.त्यामुळे मी राजकीय पुढाऱ्यांना विनंती करतो की ऑपरेशन सिन्दुर बद्दल राजकारण न करता राष्ट्रीय विजय समजले पाहिजे.सरकारला विनंती करतो की रक्षा कराराच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा विलंब किंवा दिरंगाई सरकारने खपवून घेवू नये.यामुळे देशाला मोठे नुकसान होवू शकते.

हवाईदल प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी भारतीय उद्योग महासंघाच्या व्यापार शिखर परिषदेत अत्यंत महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करून सरकारला जागे केले आहे याकरीता सरकारने त्यांचा सन्मान करायला पाहिजे पुढील कारवाईसाठी कठोर पावले उचलली पाहिजेत. सरकारने आतातरी अमर प्रीत सिंग यांच्या वक्तव्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पुढील संपुर्ण कराराचे व व संरक्षण खरेदी प्रकल्पांचे तंतोतंत पालन करून यात कोणतीही दिरंगाई होणार नाही याची जातीने काळजी घ्यावी यातच खरे देश हित आहे.सन्माननीय हवाईदल प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी देशाच्या जनतेपुढे जी सत्यता मांडली ही बाब देश कधीच विसरणार नाही.त्याकरीता त्यांना कोटी-कोटी प्रणाम,जय हिंद, जय भारत!

**- लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार )**

# मनुस्मृती दहन ते सोफिया-व्योमिका..

बाबासाहेबांच्या संविधानाने घडवलेली क्रांती कालपासून देशभरात कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग या जहाँबाज महिला अधिकाऱ्यांची जोरदार चर्चा आहे. भारतीय सैन्याने पाकिस्तानच्या हद्दीत घुसून दहशतवाद्यांविरुद्ध केलेल्या ऑपरेशन सिंदूर कारवाईनंतर या दोन महिलांनी पत्रकार परिषदेत भारताची बाजू अतिशय ठामपणे आणि आत्मविश्वासाने मांडली.

त्यांच्या या कर्तृत्वाने प्रत्येक भारतीयाचे मन जिंकले. पण या यशामागे आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या भारतीय संविधानाने महिलांना दिलेले समान हक्क आणि स्वातंत्र्य. आणि या संविधानाच्या मुळाशी आहे एक ऐतिहासिक क्रांती - मनुस्मृती दहन. जर ही क्रांती घडली नसती, तर आज सोफिया आणि व्योमिका यांच्यासारख्या महिला या उंचीवर दिसल्या असत्या का?

मनुस्मृतीत स्त्रियांना शिक्षण, स्वातंत्र्य आणि सन्मानापासून वंचित ठेवणारा होता. यानुसार, स्त्रिया पुरुषांच्या अधिपत्याखाली राहायच्या, त्यांना स्वतंत्र निर्णयाचा अधिकार




नव्हता. अशा अन्यायी परंपरांनी स्त्रियांचा आवाज दडपला. या विषमतेला छेद देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २५ डिसेंबर १ ९२७ रोजी महाड येथे मनुस्मृती दहन केले. ही केवळ एक कृती नव्हती, तर सामाजिक समतेची विचारक्रांती होती.

भारतीय संविधानाने कलम १४, १५, १६ यांच्या माध्यमातून लिंगभेद नाकारला आणि प्रत्येक नागरिकाला समान संधी दिल्या. यामुळे स्त्रियांना शिक्षण, नोकरी, आणि सैन्यासारख्या क्षेत्रात प्रवेश मिळाला. कर्नल सोफिया कुरेशी, गुजरातच्या सैन्य अधिकारी, आणि विंग कमांडर व्योमिका सिंग, भारतीय वायुसेनेच्या शूरवीर, यांनी ऑपरेशन सिंदूर नंतर पत्रकार परिषदेत भारताचे सामर्थ्य आणि एकता जगासमोर मांडली. त्यांचे हे यश संविधानाने दिलेल्या समानतेची पावती आहे.

मनुस्मृती दहन नसते, तर?

जर मनुस्मृती दहनासारखी क्रांती घडली नसती, तर समाज अजूनही अन्यायी परंपरांच्या बंधनात अडकला असता. स्त्रियांना शिक्षण, स्वातंत्र्य आणि सैन्यात उच्च पदांवर पोहोचण्याची संधी मिळाली नसती. सोफिया आणि व्योमिका यांच्यासारख्या महिलांचे यश अशक्य झाले असते. मनुस्मृती दहनाने विषमतेला आव्हान दिले आणि संविधानाने समतेचा पाया घातला.

सोफिया कुरेशी आणि व्योमिका सिंग यांचे यश हे बाबासाहेबांच्या मनुस्मृती दहन आणि संविधानाच्या क्रांतिकारी वारशाचे फलित आहे. त्यांनी दाखवले की, समानतेच्या ताकदीने प्रत्येक क्षेत्रात यश मिळवता येते. आज या दोन शूरवीर महिलांना सलाम करताना, आपण बाबासाहेबांच्या क्रांतीलाही सलाम केला पाहिजे.

सोफिया आणि व्योमिकाला सलाम!
बाबासाहेबांच्या विचारांना सलाम!

**लेखिका - विद्या डोंगरे पुणे**

# 'एमपीएससी' परीक्षेपासून मुकल्याने आणखी संधी द्या

**आत्ताच एक्सप्रेस**

**पुणे /प्रतिनिधी/** पुण्यातील विश्रामबाग परिसरातील भावे उच्च प्राथमिक शाळे जवळ घडलेला अपघात चिंतेची बाब आहे.महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी करणारे जवळपास १२ विद्यार्थी या अपघातात जखमी झाले असून यातील तिघे गंभीर जखमी झाले आहेत.आज, रविवारी असलेल्या एमपीएससी च्या परीक्षेपासून जखमी विद्यार्थी मुकण्याची शक्यता आहे. अशात या विद्यार्थ्यांबद्दल मानवीय दृष्टिकोन सरकार ने ठेवणे आवश्यक आहे,असे मत बहुजन समाज पक्षाचे प्रदेश महासचिव आणि पश्चिम महाराष्ट्र झोन मुख्य प्रभारी डॉ. हुलगेश चलवादी यांनी रविवारी (ता.१) व्यक्त केले.जखमी विद्यार्थ्यांना एमपीएससी परीक्षेची विशेष संधी द्यावी,अशी मागणी देखील त्यांनी केली.बसप यांसदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच एमपीएससी सोबत पत्रव्यवहार करणार असल्याचे डॉ.चलवादी म्हणाले.शनिवारी संध्याकाळी अपघात घडल्यानंतर जखमी तरुणांना नजीकच्या खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.त्यांच्या उपचारावर झालेला खर्चाचे वहन सरकार ने करावे जेणेकरून तरुणांना आर्थिक भुर्दंड बसणार नाही,अशी मागणी देखील बसप कडून करण्यात आली आहे.पुणे पोलिसांनी आरोपी वाहनचालक जयराम मुळे,सहप्रवासी राहुल गोसावी तसेच गाडी मालकाला अटक केली आहे.परंतु, पुण्यात वाढते अपघात लक्षात घेता वाहतूक पोलिसांकडून कठोर उपाययोजना आखण्याची गरज निर्माण झाली आहे,असे मत डॉ.चलवादी यांनी व्यक्त केले.मद्यप्राशन करीत गाडी चालवण्याचे प्रकार पुण्यात वाढले आहेत. यातून अपघाताचे प्रमाण वाढल्याने पोलिसांनी मद्यपी चालकांविरोधात धडक मोहीम आखावी,असे आवाहन देखील त्यांनी केले.अँप बेस्ड कॅब सर्व्हिस कंपन्यांनी वाहन नियुक्त करतांना संबंधित चालकाला वाहन चालवण्याचे प्रशिक्षण आहे की नाही?

# हनी ट्रॅपमध्ये अडकून देशाशी गद्दारी करणाऱ्यांना कठोर शिक्षा द्या

तरुण मुलांसोबत अश्लील चॅटिंग करून त्यांना जाळ्यात ओढणे आणि नंतर त्यांच्याकडून अश्लील कृत्ये करून घेणे ते करताना त्याचे व्हिडीओ रेकॉर्डिंग करणे. ते व्हिडीओ रेकॉर्डिंग व्हायरल करण्याची धमकी देऊन त्यांच्या कडून लाखो रुपयांची खंडणी वसूल करणे असा हातखंडा सायबर माफियांनी काही दिवसांपासून अवलंबला आहे. हाच हातखंडा आता पाकिस्ताननेही वापरला असून भारतातील संरक्षक विषयक महत्वाच्या पदावर असलेल्या व्यक्तींना सुंदर ललनांच्या जाळ्यात अडकवून त्यांच्या मार्फत भारतातील संरक्षक विषयक महत्वाची माहिती गोळा केली जात आहे. अशीच संरक्षक विषयक महत्वाची माहिती पाकिस्तानला पुरवणारा रवीकुमार वर्मा या तरुणाला पोलिसांनी नुकतेच जेरबंद केले. रविकुमार वर्मा हा एक नव्हे तर दोन पाकिस्तानी महिलांच्या संपर्कात होता. त्याने या दोन्ही महिलांना सोशल मिडियाच्या माध्यमातून वेळोवेळी भारतीय नौदल आणि डॉकयार्ड मधील पाणबुड्या व जहाजांची संवेदनशील माहिती पाकिस्तानला पाठवली होती असे एटीएसच्या चौकशीतून समोर आले आहे. रविकुमार वर्मा हा नेव्हल डॉक मध्ये ज्युनियर मेकॅनिकल फिटर इंजिनियर होता. पाकिस्तानी महिलांची रविकुमार वर्माशी सोशल मीडियावर ओळख झाल्यानंतर या महिलांनी त्याच्यासोबत अश्लील चॅटिंग करून आम्ही तुला प्रत्यक्ष भेटणार आहोत अशी भुरळ घालून त्यास या महिलांनी सतत गुंतवून ठेवले होते. त्याची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने या महिलांनी त्याला आर्थिक मदतही केली. पाकिस्तानमधून त्याच्या बँक अकाऊंटवर पैसे जमा झाल्याचेही स्पष्ट झाले आहे. रविकुमार वर्माच्या या कारनाम्याने देशभर खळबळ उडाली आहे अर्थात हनी ट्रॅपमध्ये अडकून देशाशी गद्दारी करणारा रविकुमार वर्मा हा पहिला व्यक्ती नाही. मागील वर्षीच डीआरडीओ या देशाचे संरक्षण साहित्य तयार करणाऱ्या संस्थेत शास्त्रज्ञ असलेल्या डॉ प्रदीप कुरुलकर या व्यक्तीला पोलिसांनी पाकिस्तानला देशाच्या संरक्षणासंदर्भात गुप्त माहिती पुरवल्याच्या आरोपाखाली अटक केली होती. विशेष म्हणजे डॉ कुरुलकर हे डीआरडीओ संस्थेत मागील ३८ वर्षांपासून कार्यरत होते. त्यांनी डीआरडीओच्या प्रमुख क्षेपणास्त्रांच्या प्रेक्षपक आणि ग्राउंड सिस्टीमच्या निर्मितीत महत्वाची भूमिका बजावली होती. मिशनशक्ती या उपग्रहभेदी क्षेपणास्त्राच्या प्रेक्षपकाची निर्मिती त्यांच्याच नेतृत्वाखाली झाली. डॉ एपीजे अब्दुल कलाम यांच्यासोबत त्यांनी अनेक वर्षे काम केले होते. त्यांना निवृत्त होण्यासाठी अवघी सहा महिने उरली असताना हे प्रकरण घडकीस आले. गेल्या काही वर्षांपासून ते पाकिस्तानच्या गुप्तचर विभागाच्या महिलेच्या संपर्कात होते. या महिलेने नाव बदलून त्यांच्याशी संपर्क केला. मैत्रीचे ( की प्रेमाचे ) नाटक करून त्यांच्याशी संपर्क वाढवला आणि त्यांच्याकडून देशाच्या संरक्षणासंदर्भात महत्वाची माहिती हस्तगत केली. डॉ कुरुलकर हे पाकिस्तानच्या हनी ट्रॅपमध्ये अडकल्याने देशाच्या संरक्षणा संदर्भातील अनेक महत्वाची आणि गुप्त माहिती पाकिस्तानपर्यंत पोहचली. केंद्र सरकारने याची गांभीर्याने नोंद घेऊन त्यांना त्वरित अटक केली. हनी ट्रॅप मध्ये अडकून देशाशी गद्दारी करणारे हे दोघेच नाहीत या आधीही बीएसएफचा एक जवान, अरुण मारवाह नामक वायुदलातील एक अधिकारी हनी ट्रॅपमध्ये अडकला होता. शत्रूराष्ट्राच्या गोटात शिरून त्यांच्याकडून गुप्त माहिती काढून घेणे यासाठी ललनांचा वापर करणे हे पूर्वीपासूनच चालत आले आहे. सर्वच देश हे करतात मात्र आता माहिती तंत्रज्ञान युगात हे करणे अधिक सोपे झाले आहे कारण सोशल मीडियाच्या माध्यमातून अशा महत्वाच्या पदावरील व्यक्तींना संपर्क साधने आता सहज शक्य आहे. पाकिस्तानच्या गुप्तहेर महिलांनीही हेच केले आणि रविकुमार वर्मा, डॉ कुरुलकर यांना या महिलांनी आपल्या जाळ्यात अडकवले. आता रविकुमार वर्मा यांची पूर्ण चौकशी केली जाईल त्यातून अनेक धक्कादायक माहिती समोर येईल पण देशाची संरक्षण विषयक गुप्त माहिती पाकिस्तानला मिळाली आहे त्यामुळे देशाच्या संरक्षणालाच मोठा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळेच हनी ट्रॅप मध्ये अडकून देशाशी गद्दारी करणाऱ्या रविकुमार वर्मा सारख्या गद्दारांना कठोर शिक्षा द्यायला हवी.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

मंत्र्यांच्या पीएस, ओएसडीवर पान १ वरून..


- या अधिकाऱ्यांचा 'रेकॉर्ड' कसा होता, याची तपासणी केली जात आहे.- गडबड करणारे चेहरे बदलले जातील, असं धोरण मुख्यमंत्री कार्यालयाने स्वीकारलं आहे.- पीएस, ओएसडी यांचे प्रशिक्षण पुणे येथे घेण्यात आले होते.- त्यांना 'तुमच्याबद्दल कोणतीही गैरव्यवहाराची तक्रार येता कामा नये,' असं बजावण्यात आलं आहे.यावरून संजय राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली आहे. केंद्र सरकारचा मोदी फॉर्म्युला महाराष्ट्रमध्ये राबवला जात आहे. चाचपणी केल्याशिवाय ओएसडी मिळणार नाही अस म्हटलं जात आहे. मात्र सगळेच भ्रष्ट आहेत असं संजय राऊत यांनी म्हटलं आहे.मुख्यमंत्री कार्यालयाने पीएस, ओएसडींबाबत आता आक्रमक पवित्रा घेतल्याचं दिसत आहे. महायुती सरकारमधील अनेक मंत्री गेल्या काही दिवसांपासून सतत वादात अडकत आहेत. मंत्र्यांसोबतच त्यांचे पीएस, ओएसडींची महत्वाची भूमिका असतात.

# मॅरेथॉनद्वारे महावितरणच्या सुरक्षा सप्ताहास उत्साहात प्रारंभ

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी/** महावितरणच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त 'शून्य अपघात महावितरण, शून्य अपघात महाराष्ट्र' ही संकल्पना घेऊन १ ते ६ जून दरम्यान राज्यभरात विद्युत सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त छत्रपती संभाजीनगर परिमंडलात रविवारी (१ जून) सकाळी कर्मचाऱ्यांसाठी मॅरेथॉनचे आयोजन करून सुरक्षा सप्ताहास प्रारंभ करण्यात आला.'आम्ही सुरक्षेचे शिल्पकार, शून्य अपघाताने करू महावितरणचे ध्येय साकार' हे ब्रिद घेऊन विद्युत सुरक्षेबाबत जनजागृती करत निघालेल्या कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या मॅरेथॉनचे उद्घाटन क्रांती चौकात छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे प्रभारी मुख्य अभियंता मनीष ठाकरे यांच्या हस्ते हवेत फुगे सोडून करण्यात आले. यावेळी जालना मंडलाचे अधीक्षक अभियंता संजय सरग, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण मंडलाच्या प्रभारी अधीक्षक अभियंता प्रेरणा बनकर, विद्युत निरीक्षक सतीश इंगळे, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विश्वास पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

क्रांती चौकातून रविवारी सकाळी साडेसहा वाजता मॅरेथॉनला सुरुवात झाली. विद्युत सुरक्षेबाबत फलक हाती घेत व घोषणा देत मॅरेथॉनमध्ये सहभागी कर्मचारी सिल्लेखाना चौक, सावरकर चौक समर्थनगर, वरद गणेश मंदिर, मध्यवर्ती बसस्थानक मार्ग, मिल कॉर्नरमागे जुने विद्युत भवन परिसरात पोचले. 'रन फॉर सेफ्टी' हे



घोषवाक्य घेऊन निघालेल्या मॅरेथॉनचा समारोप परिमंडल कार्यालयाच्या आवारात झाला. मॅरेथॉनमध्ये साडेसातशे कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला.

## एक धाव विद्युत सुरक्षेसाठी

कर्मचाऱ्यांमधून शरद मोकळे यांनी प्रथम तर साईनाथ तोडकर यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. तर पाल्यांतून प्रणव पाटेकरने प्रथम, मुकेश चव्हाणने द्वितीय तर ओम लिंगायतने तृतीय क्रमांक मिळवला. महिलांमध्ये ज्योती राठोड प्रथम, श्रेयांशी वाघचौरे द्वितीय तर रेखा वानखेडे यांनी तृतीय क्रमांक मिळवला. विजेत्यांना प्रभारी मुख्य अभियंता मनीष ठाकरे, अधीक्षक अभियंता संजय सरग, प्रेरणा बनकर, विद्युत निरीक्षक सतीश इंगळे, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विश्वास पाटील यांच्या हस्ते पदक देऊन गौरवण्यात आले.यावेळी कार्यकारी अभियंता प्रसाद महातोले, महेंद्र देशमुख, भूषण पहूरकर, रमेश वाघचौरे, राजेंद्र नहाटा, जनसंपर्क अधिकारी ज्ञानेश्वर आर्दड, व्यवस्थापक संजय खाडे, बापू शिंदे, नितीन पाडसवान, महारुद्र नाईकनवरे यांच्यासह अभियंते, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मॅरेथॉनच्या यशस्वीतेसाठी सागर अग्रवाल, मुंजाजी उढाण, वाल्मिक निकम, सचिन बाजपाई, शशी सपकाळ, विजय मेटे, केदारे आदींनी पुढाकार घेतला. स.भु. महाविद्यालय, सिग्मा हॉस्पिटल व शहर वाहतूक पोलिसांनी मोलाचे सहकार्य केले.२ जून रोजी परिमंडलातील सर्वच उपविभागांमध्ये रहिवासी परिसरात विद्युत सुरक्षेबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. तर ३ व ४ जून रोजी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी आणि कुटुंबीयांसाठी तसेच शालेय विद्यार्थ्यांसाठी विद्युत सुरक्षेविषयी निबंध व चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

## संक्षिप्त

## सत्यजित ताईतवाले वैजापूरचे नवे ठाणेप्रमुख

**आत्ताच एक्सप्रेस**

**वैजापूर/ प्रतिनिधी /** वैजापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक म्हणून सत्यजित ताईतवाले यांची नियुक्ती करण्यात आली आले. तत्कालीन पोलीस निरीक्षक श्यामसुंदर कौठाळे यांची छत्रपती संभाजी नगर येथे आर्थिक गुन्हे शाखेत बदली झाली असून पोलीस निरीक्षक सत्यजित ताईतवाले यांनी वैजापूर पोलीस ठाण्याचा नवे ठाणे प्रमुख म्हणून पदभार स्वीकारला आहे.यापूर्वी ते सायबर पोलीस ठाणे संभाजीनगर येथे कार्यरत हो-ते. ताईतवाले आपल्या कडक व शिस्तप्रिय कार्यशैली मुळे दबंग अधिकारी म्हणून परिचित आहेत. विरगाव, शिवूर, मुंबई,गंगापूर या ठिकाणी त्यांनी पोलीस निरीक्षक म्हणून काम पाहिले आहे.



## जणगाव शे.पुं येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर /प्रतिनिधी/** गंगापूर तालुक्यातील रांजणगाव शेणपुंजी येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची त्रिशताब्दी जयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली दिनांक ३० तारखेला रात्री ८:३० वा. भव्य दीपोत्सव साजरा करण्यात आला ३१ तारखेला सकाळी ८:३० वा. ब्राह्मण विधियुक्त पुजन करून दूध अभिषेक करण्यात आला व महाआरती करून महाप्रसादाचे वाटप करण्यात आले व मल्हार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष रामदास दादा कोळेकर पंचायत समिती सदस्य दीपक बडे यांच्या हस्ते अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून भव्य दिव्य मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली यावेळी उपस्थित सभापती साखराबाई तोगे राजू गवळी अनिल वाढोणकर विजय तोगे संजय तोगे विलास पाचपोळ राज येवले विठ्ठलराव वीर दत्तात्रय रोडगे राजू साबळे वडकुते पाटील सोनाग्रे साहेब सूर्यकांत सोडगीर बाबासाहेब रिटे गणेश तोगे राजू पिसाळ अन्नपूर्णा सोनाग्रे सविता शिंदे व आदी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## पोलीस हवालदार समद खान पठाण सेवानिवृत्त

**समाजसेवक मुसा खान यांनी सेवानिवृत्त बद्दल पुष्पगुच्छ देऊन निरोप दिला**



**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** वेदांतनगर पोलिस ठाण्यात कार्यरत असलेले हवालदार समद खान रशीद खान पठाण हे ३२ वर्षे सेवा केल्यानंतर ३१ मे रोजी निवृत्त झाले. पठाण यांनी त्यांच्या सेवेदरम्यान एमआयडीसी वाळूज, वाळूज, क्रांती चौक, गुन्हे शाखा आणि इतर ठिकाणी काम केले आहे. शनिवारी वेदांतनगर पोलिस ठाण्यामार्फत त्यांचा निरोप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी पीआय प्रवीणा यादव, सामाजिक कार्यकर्ते मुसा खान आणि इतर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी त्यांना पुष्पगुच्छ देऊन आदरपूर्वक निरोप दिला.

मुसा खान यांनी सांगितलं की, समद खान हे १९९३ मध्ये पोलीस दलात भरती झाले होते त्यानंतर समद पठाण यांनी विविध पोलीस ठाण्यात आपले कर्तव्य पार पाडीत त्यांनी पोलीस दलात ३२ वर्षीय सेवा पूर्ण केले असून समद पठाण यांना पुढील आयुष्य साठी मुसा खान यांनी शुभेच्छा दिलेले आहेत त्यांनी यापुढेही समाजामध्ये राहून चांगली समाजसेवा करावी अशी अपेक्षा ही व्यक्त केलेली आहे.

## पिंपळगाव दिवशी गावात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी



**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/ प्रतिनिधी/** पिंपळगाव दिवशी गावात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी गंगापूर तालुक्यातील पिंपळगाव दिवशी गावात पहील्यांदाच दहावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.दि.३१ मे २०२५ रोजी सकाळी ९ वाजता ग्रामपंचायत कार्यालय पिंपळगाव व रात्रि ८ वाजता छत्रपती शिवाजी स्मारक दिवशी येथे गावकऱ्यांच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सन २०२५ शैक्षणिक वर्षात पिंपळगाव व दिवशी गावातील दहावीच्या २८ व बारावीच्या १० उत्तीर्ण विद्यार्थी व पालकांचा सत्कार व भेटवस्तू देऊन करण्यात आला.या कार्यक्रमाचे आयोजन पिंपळगाव दिवशी इंजी.महेशभाई गुजर मित्रमंडळाच्या वतीने करण्यात आले होते.यावेळी पिंपळगाव व दिवशी गावातील जेष्ठ नागरिक,महीला,विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे नियोजन मुख्यमंत्री योजना दुत राहुल बडुगे,सतिश चंदिले,रामेश्वर पानकर यांनी केले होते.

# आधारकार्ड वरील जिल्हा दुरुस्तीसाठी कॅम्प आयोजित करा -माजी उपसरपंच गणेश व्यवहारे

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/प्रतिनिधी /** गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथे आधारकार्ड वरील जिल्हा नाव बदल करण्याकरिता कॅम्प आयोजित करण्याची मागणी माजी उपसरपंच तथा ग्रामपंचायत सदस्य कै अंबादास प्रतिष्ठानचे संस्थापक गणेश व्यवहारे यांनी निवेदनाद्वारे तहसीलदार यांच्याकडे केली आहे.

या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, संपूर्ण देशात विविध शासकीय कामांसाठी नागरिकांना त्यांचे आधार ओळखपत्र केंद्र शासनाने सक्तीचे केलेले आहे, तसेच या जिल्ह्याचे पूर्वीचे नाव औरंगाबाद असून असाच उल्लेख सर्वांच्या आधारकार्डवर आहे. नुकतेच त्या ठिकाणी जिल्हाबदलचा ऑप्शन छत्रपती संभाजीनगर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या नावात बदल होण्याची आवश्यकता आहे.

महाराष्ट्र शासनाने सर्वप्रथम २२ जून २०२२ रोजी अध्यादेशाद्वारे जिल्ह्याचे नाव संभाजीनगर असे बदलले. तदनंतर १६ जुलै २०२२ रोजी त्यात पुन्हा बदल करून छत्रपती संभाजीनगर करण्यात आले व यास २४ फेब्रुवारी २०२३ रोजी केंद्र शासनाने अंतिम मंजुरी दिली.

आधार ओळखपत्रातील वैयक्तिक तपशील बदलण्यासाठी नागरिकांना आधार केंद्रावर जाऊन रांगेत नंबर लावून शासन निर्धारित फी भरावी लागते परंतु जिल्हाबदल ही माहिती वैयक्तिक स्वरूपाची नसून शासकीय स्वरूपाची आहे. जिल्हाबदल करण्यासाठी सामान्य नागरिकांच्या खिशाला लागणारी कात्री तसेच होणारी गर्दी टाळणे आवश्यक आहे.त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांसाठी आधार कार्ड मधील फक्त जिल्हा हा पर्याय



बदलून देण्यासाठी मोफत कॅम्प लावण्याची आवश्यकता आहे, इतर वैयक्तिक माहिती या कॅम्पमध्ये दुरुस्ती करण्यात येऊ नये. करिता याबाबत आपल्या स्तरावरून योग्य की कार्यवाही करून सामान्य नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही.यासाठी आवश्यक ते बदल करावेत अशी माजी उपसरपंच गणेश व्यवहारे यांनी मागणी केली आहे.

## तहसीलदार कडवकरांचे बळीराजास तात्काळ ओळखपत्र काढण्याचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/उदय कुलकर्णी/**कन्नड तालुक्यातील संपूर्ण बळीराजाने तात्काळ आप आपले शेतकरी ओळख पत्र काढणे अत्यावशक असुन ते येत्या दोन दिवसात काढावे,असे आवाहन तहसीलदार विद्याचरण कडवकर यांनी केले आहे.

शासनाकडून बळीराजास मिळणाऱ्या विविध योजणांचा लाभ मिळवुन घेणेसाठी या ओळख पत्राची सक्ती आहे.त्यामुळे ते ओळखपत्र काढणे अनिवार्य आहे.ते प्रत्येक बळीराजाने हस्तगत केल्यास शासनाच्या ज्या विविध कल्याणकारी योजना आहेत.त्या सर्व योजणांचा लाभ त्या बळीराजास घेता येईल.सदर ओळख पत्र मिळून घेणेसाठी बळीराजाने आपल्या नजीकच्या शेतू सुविधा केंद्रास भेट देऊन व लागणाऱ्या कागद पत्रांची पूर्तता करून सदर ओळख पत्र तात्काळ हस्तगत करावे, म्हणजे शासनाच्या सर्व योजणांचा लाभ घेता येलील ओळख पत्र नसल्यास सदर लाभ मिळणार नाही असेही त्यांनी पुढे बोलतांना स्पस्ट केले आहे.त्यांनी पुढे असेही सांगितले की,शेतू सुविधा केंद्रात जातांना आधार कार्ड,जमिनीचा ७/१२ उतारा, चालू बँकेचे पासबुक व पासपोर्ट साईज फ़ोटो सोबत घेऊन जावे.तरी तालुक्यातील सर्व बळीराजांनी / शेतकऱ्यांनी या आलेल्या संधीचा लाभ उठवून घेणेसाठी दोन दिवसात ओळख पत्र हस्तगत करावेच असे कळकळीचे आवाहनही त्यांनी बळीराजास/शेतकरी वर्गास दिले.

## लोकांभिमुख पुरिंचा झाला विधुत महामंडळातून गौरवपूर्ण निवृती सोहळा

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/उदय कुलकर्णी/**कन्नड दि. ३१ मे २०२५ रोजी संजय जगन्नाथ पुरी यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळात ३० वर्षे उत्कृष्ट व प्रदीर्घ सेवा करून नियत वयोमानानुसार सेवेतून निवृत्ती घेतली. या गौरवप्रद क्षणी त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.संजय पुरींनी त्यांचे तीस वर्षाचे प्रदीर्ग सेवा काळात वेगवेगळ्या ठिकाणी पार पडली असून, त्यात वेळ-



ोदा, बहाळ (जिल्हा जळगाव), वासडी व अंधानेर (जिल्हा छत्रपती संभाजीनगर) यांचा समावेश होता. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, वेळेचं अचूक व्यवस्थापन आणि विजेच्या तांत्रिक ज्ञानासोबतच सामाजिक बांधिलकीही जपली. सहकाऱ्यांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवत त्यांनी नेहमी सकारात्मक वातावरण निर्माण केले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कनिष्ठ अभियंता श्री. शिंदे साहेब होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून कार्यकारी अभियंता श्री. वाघचौरे साहेब आणि संत ज्ञानेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. साबुसिंग राठोड हे उपस्थित होते.कार्यक्रमादरम्यान अनेक सहकारी व आमंत्रित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून संजय पुरी यांच्या कार्याची प्रशंसा केली व त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# फुलंब्रीच्या कृषी उत्पन्न बाजार समितीत कांदा मार्केट सुरु

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री/प्रतिनिधी/**कोणत्याही व्यवसायातून काहीतरी उत्पन्न मिळाले पाहिजे, ही स्याभाविक अपेक्षा असते. त्यामुळे शेतक-यांनी दर्जेदार माल बाजारात आणाबा आगि व्यापायांनीही सहकांची भूमिका बजावावी, असे प्रतिपादन औरंगाबाद उच्चतम बाजार समितीचे सभापती राधाकिसन पठाडे यांनी केले.

फुलंब्री कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने स्थानिक बाजार समितीच्या आवारात कांदा बाजार काल दिनांक १ जुन रविवार २०२५ रोजी सुरू करण्यात आला, त्याच्या उद्घाटना प्रसंगी ते बोलत होते. यावेळी पुणे विभागाचे अधीक्षक अभियंता अतुल चव्हाण, छत्रपती संभाजी राजे साखर कारखान्याचे उपाध्यक्ष दामूअण्णा नवपुते, बाजार समितीचे उपसभापती दत्तु करपे, रामबाबा शेळके, शिवाजी पाथ्रीकर, देवगिरी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन कल्याण चव्हाण



, बाजार समिती सचिव मनोज गोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलतांना पठाडे म्हणाले की, बाजार समिती मध्ये नगदी व्यवहार होणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना जर कोणताही त्रास झाला, तर त्याची जबाबदारी बाजार समितीबरच येते. त्यामुळे करटेकोर उराणि पारदर्शक व्यवहार समितीने करावेत, कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवाजी पाथ्रीकार यांनी केले. सूत्रसंचालन सुचित बोरसे यांनी तर आभार संचालक सर्जेराव मेटे यांनी मानले. या कार्यक्रमाला संचालक संविता फुके, योगेश राधव, अझहर सय्यद, श्रीराम म्हस्के, शिवाजी जाधव, संतोष तांदळे, कृष्णा गावंडे, योगेश मिसाळ, सुमित प्रधान, वाल्मिक सराईकर, रणजित कदम, लिषक हकले, समाधान जाधव बांच्यासह अनेक शेतकरी, व्यापारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिवशी पिंपळगाव येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती मोठ्या उत्साहात

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर / प्रतिनिधी/** गंगापूर तालुक्यातील दिवशी पिंपळगाव येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सव संपुर्ण देशभरात होत असताना पिंपळगाव व दिवशी गावात पहील्यांदाच दहावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. दरम्यान दि.३१ मे २०२५ रोजी सकाळी ९ वाजता ग्रामपंचायत कार्यालय पिंपळगाव व रात्रि ८ वाजता छत्रपती शिवाजी स्मारक दिवशी येथे गावकऱ्यांच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सन २०२५ शैक्षणिक वर्षात पिंपळगाव व दिवशी गावातील दहावीच्या २८ व बारावीच्या १०



उत्तीर्ण विद्यार्थी व पालकांचा सत्कार व भेटवस्तू देऊन करण्यात आला.या कार्यक्रमाचे आयोजन पिंपळगाव दिवशी इंजी.महेशभाई गुजर मित्रमंडळाच्या वतीने करण्यात आले होते.यावेळी पिंपळगाव व दिवशी गावातील जेष्ठ नागरिक,महीला,विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे नियोजन मुख्यमंत्री योजना दुत राहुल बडुगे,सतिश चंदिले,रामेश्वर पानकर यांनी केले होते.

## एलपीजी सिलेंडर आजपासून तब्बल 'इतक्या' रुपयांनी स्वस्त!

**आत्ताच एक्सप्रेस**

**दिल्ली/वृत्तसेवा/**दर महिन्याच्या १ तारखेपासून बँकिंगपासून ते घरच्या किचनपर्यंत अनेक गोष्टीत महत्वाचे बदल होतात. आजपासून देशातील सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. आज म्हणजेच १ जूनपासून एलपीजी सिलिंडर स्वस्त झालाय. सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्यांनी १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या किमतीत लक्षणीय घट केलीय. ओएमसींनी १९ किलोच्या व्यावसायिक सिलिंडरच्या किमतीत २४ रुपयांची कपात केली. हा नवा दर आजपासून म्हणजेच १ जूनपासून लागू झालाय. असे असले तरी घरगुती एलपीजी सिलिंडरच्या किमतीत कोणताही बदल झालेला नाही.

एलपीजी २४ रुपयांनी स्वस्त

एलपीजी सिलिंडरच्या किमती २४ रुपयांनी कमी करण्यात आल्या आहेत. आजपासून नवीन दर लागू झाल्यानंतर दिल्लीत व्यावसायिक एलपीजी सिलिंडरची किरकोळ किंमत आता १७२३.५० रुपये असेल. याआधी १ मे रोजी व्यावसायिक सिलिंडरची किंमत देखील कमी करण्यात आली होती. व्यावसायिक एलपीजी सिलिंडरमधील ही कपात व्यावसायिकांच्या चेहऱ्यावर हास्य आणणारी आहे. हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, ढाबे इत्यादी व्यावसायिक आस्थापनांना व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या कपातीमुळे दिलासा मिळणार आहे.

**तिसऱ्या महिन्यात पुन्हा किमती कमी**

गॅसच्या किमती कमी करण्याची ही सलग तिसरी वेळ आहे. यापूर्वी १ मे रोजी तेल कंपन्यांनी १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलिंडरची किंमत १४.५० रुपयांनी कमी केली होती. या कपातीनंतर एलपीजीची किंमत १७४७.५० रुपये होती. त्याचवेळी १ एप्रिल रोजी व्यावसायिक सिलिंडरची किंमतही ४१ रुपयांनी कमी करण्यात आली होती.

नवीन किमती घरगुती एलपीजी सिलिंडरच्या किमतीत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. १४.२ किलोचा एलपीजी सिलिंडर पूर्वीप्रमाणेच जुन्या किमतीत उपलब्ध आहे. हा सिलिंडर दिल्लीत ८५३ रुपये, मुंबईत ८५२.५० रुपये, कोलकातामध्ये ८७९ रुपये आणि चेन्नईमध्ये ८६८.५० रुपयांमध्ये उपलब्ध आहे. याचा अर्थ एलपीजीच्या किंमती कमी झाल्या असल्या तरी सामान्य ग्राहकांना सध्या कोणतीही सवलत मिळणार नाही.

# दुचाकी चोरट्यांचा पर्दाफाश पिशोर पोलिसांची मोठी कारवाई

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/ प्रतिनिधी/** कन्नड तालुक्यातील पिशोर पोलिसांनी दुचाकी चोरीच्या टोळीचा पर्दाफाश करत मोठी कारवाई केली आहे. तब्बल १४ चोरीच्या दुचाकी जप्न करत दोन मुख्य आरोपींना अटक करण्यात आली असून, सुमारे १२ लाख ७० हजार रुपयांचा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे. या कारवाईमुळे परिसरात मागील काही महिन्यांपासून सुरु असलेल्या दुचाकी चोरीच्या घटनांना मोठा अडसर बसला आहे. २८ मे रोजी दीपक सखाहरी जंगले (रा. कान्हेगाव, ता. फुलंब्री) यांनी पिशोर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यांची स्प्लेंडर दुचाकी (क्र. एम.एच. २० जी.पी. २२९४) चोरीस गेली होती. पोलीस तपास पथकाने या गुन्ह्याचा तपास सुरू केला असता, गुप्त माहितीच्या आधारे नागापूर (ता. कनड) येथील नाविदोद्दीन नजीरोद्दीन शेख (वय २४) बास ताब्यात घेण्यात आले. प्राथमिक चौकशीत त्याने गुन्ह्याची.कबुली




दिली. तपास अधिक खोलवर जाताच, शेख मुजाहिद शेख युनूस (रा. करीमनगर, कन्नड) या साथीदारांची नाव समोर आला. पोलिसांनी शेख मुजाहिद याला ताब्यात घेतल्यानंतर त्यांच्या ताब्यातून वरील चोरलेल्या १४ मोटारसायकली हस्तगत करण्यात आल्या. जप्त करण्यात आलेल्या वाहनांमध्नो ३ रॉयल एनफिल्ड बुलेट, ३ युनिकॉर्न, २ होंडा शाइन, ५ स्प्लेंडर व १ एचएफ डिलक्सथा समावेश आहे. या गाड्या पिशोर, कन्नड शहर व ग्रामीण, सिल्लोड, अंजिठा, फुलंब्री, एमआयडीसी व सिडको पोलीस ठाण्यांच्या हद्दीतून चोरीस गेल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. उर्वरित.चार गाड्यांचे मालक व पोलीस ठाणे अद्याप स्पष्ट झालेले नाहीत. नाविदोद्दीन शेख व शेख मुजाहिद यांना पुढील तपासासाठी कन्नड न्यायालयात हजर केले असता, त्यांना २ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. त्यांच्याकडून उर्वरित दुचाक्यांबाबत सखोल चौकशी सुरु आहे. पोलीस निरीक्षक सतिष वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी नागवे व त्यांचे तपास पथक पोलीस उपनिरीक्षक विश्वजीत फरताडे, हवालदार विलास सोनवणे, लालचंद नागलोत, दत्तू लोखंडे, वसंत पाटील, परमेश्वर दराडे, गणेश कवाळ, पवन खंबार, साई घुगे, कौतिक.सपकाळ, संतोष चुनावत, करण म्हस्के, कल्याण बहुरे यांनी ही कारवाई यशस्वी केली. सदर गाड्यांपैकी काही नंबर प्लेटसह असून काही गाड्यांचे चेसिस अथवा इंजिन क्रमांक खोडलेले आहेत. नागरिकांनी अशा प्रकारच्या संशयास्पद गाड्या खरेदी करताना पूर्ण मूळ कागदपत्रांची खातरजमा करावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. कोणाच्या ताब्यात जुनी दुचाकी असून तिची कागदपत्रे नसतील, तर त्यांनी तात्काळ पोलीस निरीक्षक शिवाजी नागवे यांच्याशी संपर्क साधावा. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, असेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे. पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंग व उपविभागीय पोलिस अधिकारी विजयकुमार ठाकुरवाड याच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली.

**१२.७० लाखाचा १४ मोटरसायकल जप्त**

# अजित पवारांना आता पंख फुटलेत

## वाटी-वाटीत नव्हे तर ते समुद्रात तोडपाणी करतात; लक्ष्मण हाकेंचा थेट दादांवर हल्ला

आत्ताच एक्सप्रेस

पुणे/प्रतिनिधी/ओबीसी नेते लक्ष्मण हाके आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते यांच्यात सध्या जोरदार खडाजंगी सुरु असल्याचे पाहायला मिळत आहे. दोन्हीकडून ऐकमेकांवर आरोप प्रत्यारोप होत आहेत. दरम्यान, राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी आणि राष्ट्रवादी युवकचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी केलेल्या टीकेला लक्ष्मण हाके यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. अजित पवार तुमचा माणूस बाव-चळला आहे, असे म्हणत मिटकरींवर हाकेंनी टीका केली. अजित पवार तुम्ही ओबीसींच्या मुलांना वसतिगृह का देत नाहीत? असा सवाल हाके यांनी केला. अजित पवार यांनी माझ्या पाठीमागे त्यांची पलटण लावली आहे.अमोल मिटकरीचा स्क्रू ढिल्ला झाला आहे असेही हाके म्हणाले.

अजित पवार हे शरद पवार यांच्या रिचार्जवर चालतात, आता अजित पवार यांना पंख फुटलेत असेही हाके म्हणाले. अजित दादांना असा बाण लागला की त्यांना त्यांची अख्खी पिलावळ माझ्या अंगावर सोडावी लागली आहे. आम्ही महायुतीला पाठिंबा दिला, तू आम्हाला विरोध करतोय, तू महायुतीच्या बाजू-ने आहेस की विरोधात आहे? असा सवाल हाके यांनी मिटकरी यांना केला. ज्याला कोणी हुंगत नाही, अशी माणसं तुम्ही माझ्यावर सोडतात; असेही हाके म्हणाले. सुरज चव्हाण तुला गावातली कुत्रे तरी ओळखतात का? मी कलंक आहे की नाही हे माझा ओबीसी समाज, धनगर समाज ठरवले असे हाके म्हणाले. मला तुझ्या सर्टिफिकेटची गरज नाही असे हाके म्हणाले.

भारतातील ८० टक्के दारूच उत्प-ादन महाराष्ट्रात होतं, महाराष्ट्रात होणारं दारूच उत्पादन सुनील तटकरेच्या पक्षाचे कारखानदार आणि भांडवलदार मंडळी करतात असे म्हणत हाकेंनी तटकरे यांच्यावर टीका केली. अमोल मिटकरी जोपर्यंत वायझेड या शब्दाचा अर्थ सांगणार नाही, तोपर्यंत आम्ही त्याला माकडच म्हणणार असे हाके म्हणाले. मी एका वाटीत तोडपाणी करतो, अजित पवार हे समुद्रात तोडपाणी करतात असेही हाके म्हणाले. उमेदवारी मागे घेतलेल्या माणसाबरोबर कशी मॅनेजमेंट होऊ शकतो असे म्हणत व्हायरल ऑडियो क्लिपवर लक्ष्मण हाके यांनी स्पष्टीकरण दिले आहे. अमोल मिटकरी एकीकडे म्हणतो माझी औकात नाही आणि दुसरीकडे म्हणतो मी उमेदवार मॅनेज करतो असेही हाके म्हणा-



ले. ओबीसींच्या हक्क अधिकाऱ्यांवर अडचण येतेय असं आम्हाला वाटलं तर आम्ही महाराष्ट्र गदागदा हलवून जरांगेंना अडवणार असल्याचा इशाराही हाकेंनी दिला. आमच्या हक्क अधिकाऱ्यांना कोणी चॅलेंज केलं तर आम्ही कोणालाही सोडणार नाही, मग ते सरकार असो अथवा जरांगे असेही हाके म्हणाले.

## पवार काका-पुतण्या पुन्हा एकत्र

बंद दाराआडच्या बैठकीत काय साखरपेरणी झाली?

**आत्ताच एक्सप्रेस**

**पुणे /प्रतिनिधी**/दोन्ही राष्ट्रवादी पुन्हा एकत्र येणार का? पवार काका पुतण्याचं मनोमिलन होणार का? महाराष्ट्राच्या राजकारणात असे सवाल विचारले जात असतानाच पुन्हा एकदा शरद पवार आणि अजित पवार पुण्यात एकत्र आले. निमित्त होतं वसंतदादा साखर संकुलात आयोजित एका बैठकीचं. या बैठकीत दोन्ही पवार एकत्र बसले होते. कृषी क्षेत्रात एआयच्या वापराबाबत या बैठकीत चर्चा झाल्याचं बोललं जातंय. पण या बैठकीनंतर शरद पवार, अजित पवार आणि जयंत पाटील यांची आणखी एक बैठक झाल्याची माहिती आहे. या बैठकीत नेमकी काय साखरपेरणी झाली? असा प्रश्न आता विचारला जात आहे.

एप्रिल महिन्यात याच विषयावर चर्चा करण्यासाठी याच ठिकाणी दोन्ही नेते एकत्र आले होते. त्यानंतर आज पुन्हा कृत्रिम बुद्धीमत्तेच्या संभाव्य वापराबाबत दोन्ही राष्ट्रवादीच्या प्रमुख नेत्यांनी खल केला. अर्थात, या भेटीचं कागदोपत्री कारण काहीही असलं तरी महाराष्ट्राच्या राजकारणात मात्र वेगळ्याच कारणासाठी या भेटीकडं पाहिलं जात आहे.

शरद पवार आणि अजित पवारांचा पक्ष एक होणार का, या प्रश्नाची चर्चा सध्या राज्यात सुरु आहे. या प्रश्नाचं उत्तर सध्या एआयकडे नाहीच, मात्र स्वतः शरद पवारांकडेही ते नसल्याचं त्यांच्या प्रतिक्रियेतून दिसून आलं होतं. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार का या प्रश्नावर आपल्याला त्याबद्दल माहिती नाही असं शरद पवार म्हणाले.

पुण्याच्या साखर संकुलात एआयच्या वापराबाबतची बैठक पार पडली. या बैठकीला दोन्ही पवार, जयंत पाटील यांच्यासोबत माजी मंत्री बाळासाहेब थोरात आणि दिलीप वळसे पाटील देखील उपस्थित होते. मात्र या बैठकीनंतर साखर संकुलात बंद दाराआड दोन्ही पवार आणि जयंत पाटील यांच्यात आणखी एक वेगळी बैठक पार पडल्याची माहिती आहे. जयंत पाटलांनी तसं झाल्याचं नाकारलं असलं तरी या बैठकीत नेमकी काय साखरपेरणी झाली असेल असा प्रश्न विचारला जात आहे.

यावेळी एकत्र येण्याची शक्यता जास्त

पवार काका-पुतणे एकत्र येण्याची चर्चा यापूर्वीही अनेकदा रंगली होती. मात्र यावेळी ही शक्यता अधिक गडद झाल्याचं चित्र आहे. असं होणं शक्य नाही, असं आत्मविश्वासानं सांगणारे शरद पवारांचे नेते यावेळी मात्र ताकही फुंकून पित असल्याचं चित्र आहे.

यावर त्यांचे नातू आणि आमदार रोहित पवार म्हणाले की, दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार का जसा प्रश्न तुम्हाला पडला आहे तसा अनेकांना पडला आहे. मात्र आजपर्यंत फक्त ही चर्चा आहे. वरिष्ठ पातळीवरुन जर आम्हाला काही कळालं तर आम्ही समोरून येऊन नक्की सांगू.

एप्रिल महिन्यात पवार काका-पुतणे वेगवेगळ्या निमित्तानं तीन वेळा एकमेकांना भेटले होते. त्यानंतर आता पुन्हा या दोघांनी बंद दाराआड चर्चा केली. त्यामुळे शेतीचा उत्पादकता वाढवता वाढवता हे दोन्ही नेते राजकीय उत्पादकताही वाढवणार का, याची उत्कंठा चांगलीच वाढली आहे.

## मुलीच्या आईची संसारात ढवळाढवळ नको; मराठा समाजाची लग्नासाठी आचारसंहिता

**आत्ताच एक्सप्रेस**

**अहिल्यानगर/प्रतिनिधी/** पुण्यात वैष्णवी हगवणेच्या आत्महत्येनंतर शाही विवाह सोहळे, हुंडा, मानपान, लग्नातले दिखावे याचीही चर्चा सुरू झाली. यावर अहिल्यानगरमधील मराठा समाजाने अत्यंत पुरोगामी पाऊल उचलत समाजातून हुंडा हद्दपार करण्याचा विडा उचलला आहे. तसेच लग्नातल्या बडेजावाला काट मारणारी एक आचारसंहिताच जाहीर केली आहे.

वैष्णवी हगवणे आत्महत्येनंतर खडबडून जागा झालेल्या मराठा समाजातल्या विचारवंतांनी अहिल्यानगरात एक बैठक घेत अतिशय महत्त्वपूर्ण आणि पुरोगामी पाऊल उचललं. लग्न साध्या पद्धतीने करा, हुंडा प्रथा बंद करा, प्रीवेडींग शूट बंद करा असे काही नियम या आचारसंहितेत घालून देण्यात आले आहेत. आचारसंहितेचं पालन करणाऱ्या पालकांचा समाजातर्फे जाहीर सत्कार करण्यात येणार आहे. तसंच आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी ११ जणांची सुकाणू समितीही स्थापन करण्यात आली आहे.

उेवश जष उेपर्वीलीं ॠी थशववळपस : मराठा समाजाच्या लग्न समारंभासाठी आचारसंहिता

१. लग्न सोहळा (१००/२००) मर्यादित लोकात केला जावा.

२. प्री-वेडिंग प्रकार बंद करावा. केलाच तर तो लग्न सोहळ्यात जाहीर दाखवू नये.

३. कसल्याही परिस्थितीत लग्न वेळेवरच लावावे.

४. लग्नात डीजे नको.पारंपरिक वाद्य, लोक कलावंतांना संधी द्या.

५. कर्ज काढून लग्नात खर्च करू नये. मराठा समाजात लग्नाच्या कर्जामुळेच अनेक आत्महत्या झालेल्या आहेत.

६. नवरदेवापुढे दारू पिऊन नाचणाऱ्या तरुण-तरुणींना पायबंद घालावा.

७. हार घालताना नवरा नवरीला उचलू नका.

८. लग्नात फक्त वधूपिता आणि वर पिता यांनीच फेटे बांधावेत. पाहुण्यांचे फेटे आणि इतर सत्कार बंद करावेत.

९. लग्न, वाढदिवस, उद्घाटन कार्यक्रमात, पुस्तके, झाडाची रोपे किंवा रोख स्वरूपात आहेर करावेत.

१०. लग्नात प्रमुख व्यक्तीच्या हस्ते सोन्याचे दागिने, गाडीच्या चाव्या, वस्तू देऊ नयेत. देखावा करू नये.

११. लग्नात हुंडा देऊ-घेऊ नये. वडिलांची खूपच इच्छा असेल तर मुलीच्या नावावर एफडी करावी.

१२. लग्न, साखरपुडा, हळद एकाच दिवशी करा.

१३. लग्नानंतर मुलीच्या आईने मुलीच्या संसारात ढवळाढवळ करू नये. मोबाईलचा वापर गरजेपुरताच करावा.

१४. पैशासाठी सूनेचा छळ करू नये.

१५. समाजातील नव उद्योजकांना प्रोत्स-ाहन देण्यासाठी आपल्या ऐपतीप्रमाणे आर्थिक मदतीचा हात द्यावा. नुसत्या शुभेच्छा नकोत.

१६. जेवणात ५ हून अधिक पदार्थ नकोत.

१७. विविध कार्यक्रमानिमित्त होणाऱ्या भोजन प्रसंगी अन्नाची नासाडी टाळण्यासाठी, सुकी भोजन पाकीट व्यवस्था असावी.

१८. दशक्रिया विधी पाचव्या दिवशी करा. लग्न आणि दशक्रिया विधीला मान्यवरांचे आशीर्वाद, श्रद्धांजली हा कार्यक्रम बंद करावा. श्रद्धांजलीसाठी गरज वाटल्यास वेगळा विशेष कार्यक्रम घ्यावा.

विशेष म्हणजे असेच नियम याअ-ाधी आगरी समाजानेही तयार केले आहेत. कोकणातही सर्व समाजांच्या लग्नात कित्येक पिढ्या हुंडा, देणीघेणी, मानपान होत नाहीत. तसंच लग्नाचा खर्चही अर्धा अर्धा केला जा-तो. आता मराठा समाजानेही आचारसंहिता निर्माण करून फुकटच्या बडेजावाला पायबंद घातलाय ही खरोखर स्वागतार्ह बाब आहे.

## वैष्णवीचा छळ, करिश्माला फूस; निलेश चव्हाणच्या घरात पोलिसांना सापडल्या धक्कादायक गोष्टी!

**आत्ताच एक्सप्रेस**

**पुणे/ प्रतिनिधी/** वैष्णवीच्या बाळाची हेळसांड करणाऱ्या निलेश चव्ह-ाणला घेऊन पोलीस पिंपरी चिंचवडमध्ये पोहचलेत. गेले दहा दिवस पोलिसांना गुंगारा देणाऱ्या निलेशला नेपाळच्या सीमेवरून बेड्या ठोकण्यात आल्या. वैष्णवीच्या बाळाची हेळसांड केल्याचा निलेश चव्हाणवर आरोप आहे. नेपाळमध्ये अटक केल्यानंतर विमानाने पिंपरी चिं-चवड पोलिसांनी त्याला मध्यरात्री अडीच वाजता पुण्यात आणलं. येथे निलेश राहत असलेल्या कर्वे नगरच्या घरी त्याला पो-लीस घेऊन आले. तेथे त्याची चौकशी करण्यात आली. या तपासात पोलिसांना धक्कादायक गोष्टी सापडल्या.

निलेश चव्हाणची थेरगाव रुग्णालयात वैद्यकीय चाचणी पूर्ण झाली. वैद्यकीय चाचणीनंतर पहाटे ४ वाजता बावधन पोलिसांकडे निलेश चव्हाणचा ताबा देण्यात आला. गेले दहा दिवस तीन राज्यातून प्रवास करत तो नेपाळमध्ये पोहोचला होता. तिथून पुन्हा एकदा भारत आणि नेपाळच्या सीमेवरील सुनौलीत तो आला अन तिथंच पिंपरी चिंचवड पोलिसांच्या गुन्हे शाखा आणि ऍन्टी गुंडा स्कॉडने बेड्या ठोकल्या. निलेश चव्हाण हा कोकण मार्गे मुंबई आणि तिथून तो दिल्लीला पळाला. पुढे दिल्लीतून तो तसाच गोरखपूर मार्गे नेपाळ बॉर्डर क्रॉस करून देशाबाहेर पळून जाणार होता. पण पिंपरी चिंचवडच्या गुन्हे शाखेने त्याला नेपाळ बॉर्डर क्रॉस करायच्या आधीच सोनवली गावातून पकडला. हे ठिकाण युपीच्या गोरखपूर जिल्ह्यातून पुण्यात आणलं आहे. मुंबई कर्जत रायगड बाय रोड दिल्ली गोरखपूर, सोनवली (उत्तर प्रदेश) भैरवा (नेपाळ) काठमांडू, परत भैरवा परत सोनवली (उत्तर प्रदेश) येथे त्याला अटक करण्यात आली.

## संक्षिप्त

### पापडाच्या चवीतून आत्मनिर्भरतेची चव!

दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट, महागाई आणि सततच्या संकटांमुळे शेती करणारा माणूस दिवसेंदिवस हतबल होत चालला असताना, जळगाव जिल्ह्यातील एका ग्रामीण महिलेनं या संकटांवर मात करत स्वतःचं एक स्वतंत्र अस्तित्व निर्माण केलं आहे. शेतीसह अन्नप्रक्रिया उद्योगाचा हातभार लावून तिनं फक्त स्वतःलाच नव्हे तर इतर ग्रामीण महिलांना आत्मनिर्भरतेचा मार्ग दाखवला आहे. ही यशोगाथा आहे सौ. ज्योती प्रकाश पाटील यांची!

शेतातून उद्योगाचं बीज

देवगाव-देवळी ता. अमळनेर येथील ज्योती पाटील या पारंपरिक शेतकरी कुटुंबातील. सततच्या निसर्गाच्या लहरींना सामोरं जात, शेतीतून फारसा फायदा होत नसल्याने, आपल्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीत काही तरी वेगळं करून मदतीचा हात द्यायचा हे त्यांनी मनोमन ठरवलं.

घरात उडदाची, नागलीची आणि आंब्याची शेती असल्याने त्यांनी अन्नप्रक्रिया उद्योगात संधी शोधली. पापड, लोणचं, आवळा सरबत वगैरे तयार करण्यासाठी कच्चा माल घरचाच, त्यामुळे त्यांचं गणित सुचत गेलं.

शासन योजनांचं सक्षम पाठबळ

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाकडून आर्थिक मदत, मशीनरी खरेदीसाठी अनुदान आणि मार्गदर्शन मिळालं. एकूण १० लाख रुपयांचा प्रकल्प उभारण्यात आला, त्यातील ७ लाख रुपयांची पापड निर्मिती यंत्रणा शासनाच्या ३०% अनुदानासह साकारण्यात आली.

घराच्या धब्यावर उभारलेल्या शेडमध्ये कुलस्वामिनी पापड उद्योग या नावाने ज्योतीताईंनी त्यांचे पती प्रकाश पाटील यांच्या मदतीने २०२०-२१ पासून हा उद्योग सुरु केला.

रोजगारी व उत्पादन क्षमता

प्रारंभी लहान प्रमाणात सुरू झालेला हा उद्योग आता दरमहा ७० हजार रुपयांपर्यंतचे उत्पादन देत आहे. विशेष म्हणजे, हे उत्पादन संपूर्ण सेंद्रीय व रसायनमुक्त असल्यामुळे ग्राहकांकडून त्यास चांगला प्रतिसाद मिळतो आहे. पाच प्रकारचे पापड, विविध प्रकारचं लोणचं, आवळा कँडी, मुरब्बा आणि सरबत अशा उत्पादनांची मोठ्या प्रमाणावर विक्री केली जाते.

ज्योतीताईंचा माल आज इंदोर, जळगाव, नाशिक, पुणे, अहमदनगर, सुरत या शहरांमध्ये जातो. स्थानिक बाजारपेठ आणि वैयक्तिक जनसंपर्काच्या माध्यमातून त्यांनी मजबूत ग्राहकवर्ग उभा केला आहे.

ग्रामीण महिलांसाठी प्रेरणास्त्रोत

या उद्येगामुळे आज ३ ते ४ महिलांना स्थायी रोजगार मिळाला आहे. गावातील अनेक महिलांनी त्यांचा प्रकल्प प्रत्यक्ष पाहून प्रेरणा घेतली आहे. 'उमेद' योजनेतून काही महिलांनी मसाला उद्योग, शेवया बनवणे इ. व्यवसाय सुरू केले आहेत. म्हणजेच ज्योतीताईंनी फक्त स्वतःचा विकास केला नाही, तर इतरांना विकासाची दिशाही दिली आहे.

आत्मनिर्भर महिला

कोणतीही मोठी शैक्षणिक पदवी नसताना, ग्रामीण भागात राहूनही, पारंपरिक जीवनशैलीतून बाहेर पडत ज्योतीताईंनी दाखवून दिलं आहे की - संकटं आली तरी संधी शोधता येते. त्यांच्या या यशस्वी वाटचालीत कौटुंबिक पाठिंबा, शासनाची मदत, आणि स्वतःचा धैर्यशील दृष्टिकोन यांचा फार मोठा वाटा आहे.

आज कुलस्वामिनी पापड उद्योग फक्त एक व्यवसाय राहिलेला नाही, तर ग्रामीण भागातील महिलांसाठी तो एक दीपस्तंभ बनलेला आहे - स्वावलंबनाचा, जिद्दीचा आणि आत्मनिर्भरतेचा!

**- जिल्हा माहिती कार्यालय, जळगाव**

## पंचायत समितीसमोरील उपोषणकर्त्यांची तब्येत खालावली; बीडीओ यांना जबाबदार धरण्याचा इशारा

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद/प्रतिनिधी/** खुलताबाद पंचायत समिती कार्यालयासमोर मागील सहा दिवसांपासून सुरू असलेल्या आमरण उपोषणाला आता अधिक तीव्र वळण मिळाले आहे. उपोषणकर्ते संदीप मुनवर आणि सोमिनाथ निकाळजे यांची तब्येत रविवारी खालावली असून मात्र अद्याप गटविकास अधिकारी माहिती सबंधित माहिती देण्यास टाळाटाळ करत आहे दरम्यान रविवारी उपोषणकर्त्यांची तब्येत खालवल्याने ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकिय अधिकारी यांनी चक्क शिपाई आणि काही कर्मचारी यांना पाठवल्याने उपोषणस्थळी गोंधळ बघायला मिळाला. याप्रसंगी उपोषणकर्त्यांच्या जिवितास काही हानी झाली, तर त्यास पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रकाश नाईक हे पूर्णपणे जबाबदार राहतील, असा इशारा खिर्डी गावाचे सरपंच कृष्णा दवंडे यांनी माध्यमांना दिला आहे.

खिर्डी गावातील दलित वस्तीत झालेल्या विकासकामांची माहिती देण्यात होत असलेली दिरंगाई, तसेच अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे उपोषणकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. मागणी असूनही स्पष्ट आणि ठोस माहिती न मिळाल्याने उपोषणकर्त्यांनी उपोषण मागे घेण्यास स्पष्ट नकार दिला आहे.आम्ही शांततामय मार्गाने आमचे हक्क मागत आहोत. पण प्रशासन फक्त आश्वासनांची पुस्तके वाचत आहे. आमच्या सहकाऱ्यांच्या जिवास काही झाल्यास, याला केवळ प्रशासन आणि विशेषतः बीडीओ प्रकाश नाईक हेच जबाबदार असतील, असे स्पष्ट शब्दांत सहकारी कृष्णा चव्हाण यांनी सांगितले.

सहा दिवस उलटून गेले तरी बीडीओ माहिती का देत नाही असा सवाल उप-स्थित केला जात आहे.या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तत्काळ लक्ष घालून मागण्या पूर्ण कराव्यात, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला



आहे. दरम्यान, नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांनीही या प्रकरणाची दखल घेण्याची मागणी केली आहे.उपोषणस्थळी उपोषणकर्त्यांची तब्येत खालवल्यानंतर खुलताबाद ग्रामीण रुग्णालयातील काही कर्मचारी तपासण्यासाठी घटनास्थळी आले होते. मात्र, त्यांनी पाठवलेले कर्मचारी केवळ सिक्युरिटी गार्ड.होते, यामुळे उपोषणकर्ते आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. उपोषणकर्त्यांनी प्राथमिक उपचार घेण्यास नकार दिला आणि रुग्णालय प्रशासना विरोधात रोष व्यक्त केला.ही बाब संबंधित कर्मचाऱ्यांनी वैद्यकीय अधिकारी डॉ. वंदना गायसमुद्रे यांना कळवली.त्यानंतर डॉ. गायसमुद्रे यांनी स्वतः उपोषणस्थळी भेट दिली आणि उपोषणकर्त्यांना प्राथमिक उपचार घेण्यास सांगितले.

तब्येत अधिक खालावल्याने शेवटी उपोषणकर्त्यांनी उपचार स्वीकारले.मात्र, ग्रामीण रुग्णालयाच्या नियोजन शून्य कारभारावर ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त करत सबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ निलंबित करण्याची मागणी केली.

## पंजाबच्या बॉलरचे आगळे वेगळे सेलिब्रेशन

आयपीएल २०२५ च्या हाय-व्होल्टेज क्वालिफायर २ सामन्यात ५ वेळची चॅम्पियन संघ मुंबई इंडियन्स पंजाब किंग्जचा सामना करत आहे. या सामन्यात पावसामुळे बराच वेळ सामना थांबला होता, पण नंतर सामना सुरू झाल्यावर मुंबई इंडियन्स संघ प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात आला. पण या सामन्याच्या तिसऱ्या षटकात मुंबई संघाला मोठा धक्का बसला. कारण रोहित शर्मा आऊट झाला.मार्कस स्टोइनिस मुंबईच्या डावातील तिसरा षटक टाकण्यासाठी आला. स्टोइनिसने या षटकातील दुसरा चेंडू रोहितला शॉर्ट टाकला. रोहित अनेकदा त्यावर पुल शॉट मारतो आणि यावेळी पण त्याने तो खेळला. पण रोहितचा शॉट नीट टाईम नाही झाला आणि विजय कुमारने त्याचा झेल सहज पकडला. यासोबतच, ७ चेंडूत ८ धावा काढून रोहितचा डाव संपला.

एलिमिनेटर सामन्यात शानदार खेळी केल्यानंतर मुंबई इंडियन्सच्या चाहत्यांना दुसऱ्या क्वालिफायर सामन्यात रोहित शर्माकडून मोठी खेळी अपेक्षित होती. पण, रोहित ७ चेंडूंचा सामना केल्यानंतर फक्त ८ धावा काढत बाद झाला. पंजाबचा कर्णधार श्रेयस अय्यरने हिटमॅनला पॅव्हेलियनमध्ये पाठवण्याची मास्टर प्लॅन बनला होता. कारण, पॉवरप्लेमध्येच अय्यरने बॉल मार्कस स्टोइनिसला दिला. रोहितला पॅव्हेलियनमध्ये पाठवण्याची अय्यरची युक्ती कामी आली. तिसऱ्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर स्टोइनिसविरुद्ध मोठा शॉट मारण्याचा प्रयत्न करताना रोहितने एक सोपा झेल दिला.

लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे मुंबई इंडियन्सच्या डावाच्या दुसऱ्या षटकात रोहित शर्माचा कॅच सुटला होता. काइल जेमिसनच्या चेंडूवर रोहितचा कॅच पॉइंटवर उभ्या असलेल्या अझमतुल्लाह उमरझाईने सोडला. एलिमिनेटर सामन्यातही असेच काहीसे घडले जिथे रोहितने ८१ धावांची खेळी केली, परंतु त्याचे ३ कॅच गुजरातच्या खेळाडूंनी सोडले होते.

रोहित शर्माची विकेट घेणाऱ्या गोलंदाज मार्कस स्टोइनिसने आगळे वेगळे सेलिब्रेशन केले. रोहितची विकेट घेतल्यानंतर मार्कस स्टोइनिसने छातीत मारत सेलिब्रेशन केले. मात्र, त्यानंतर तिलक वर्माने त्याच षटकात त्याला सलग दोन षटकार मारले. त्यामुळे पंजाब संघाला रोहितच्या विकेटचा कोणताही फायदा झाला नाही.

दुसऱ्या क्वालिफायरमध्ये पंजाब किंग्ज आणि मुंबई इंडियन्सने त्यांच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये प्रत्येकी एक बदल केला आहे. युजवेंद्र चहल पंजाबच्या कॅम्पमध्ये परतला आहे. चहल त्याच्या दुखापतीतून बरा झाला आहे आणि या सामन्यात खेळणार आहे. त्याच वेळी, मुंबईला त्यांच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये एक बदल करावा लागला आहे. जखमी ग्लीसनच्या जागी रीस टॉपलीचा अंतिम अकरामध्ये समावेश करण्यात आला आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813